गोविंदराव वारजूकर महाविद्यालय,नागभीड





## राज्यशास्त्र विभाग

# भारतीय लोकशाही

B.A. भाग1(सेम.I)

**प्रा.मंगेश टी.देवढगले**

This Photo by Unknown Author is licensed under CC BY-NC-ND



# कार्यपालिका

राष्ट्रपती, पंतप्रधान व मंत्रिमंडळ म्हणजे केंद्र सरकारमधील कार्यकारी विभाग (Union) Executive) होय. या विभागाला केंद्रीय कार्यकारिणी असेही संबोधिले जाते. लोकसभा व राज्यसभा अशी दोन सभागृह असणारी संसद म्हणजे केंद्रीय कायदेमंडळ (कायदे विभाग) होय. संविधानानुसार निर्माण झालेली केंद्रीय शासनव्यवस्था आपणास समजून घ्यावयाची आहे. केंद्रीय कार्यकारिणीच्या अभ्यासाचा प्रारंभ राष्ट्रपतीपदापासून होतो, असे म्हणता येईल.

## राष्ट्रपती(President)

राष्ट्रपती हा भारताचा राष्ट्राध्यक्ष आहे. म्हणजे भारतीय गणराज्याचा प्रमुख आहे. देशाचा प्रथम नागरिक म्हणून त्याला राष्ट्रातर्फे मानवंदना दिली जाते. संविधानाचे जतन, संरक्षण व बचाव करण्याची जबाबदारी राष्ट्रपतीवर आहे. राष्ट्रपती हा घटनात्मक शासनप्रमुख होय असे म्हटले जाते. संपूर्ण देशाचा राज्यकारभार राष्ट्रपतीच्या नावाने सुरू असतो. पंतप्रधान, केंद्रीय मंत्रिमंडळातील मंत्री, निर्वाचन आयुक्त, न्यायाधीश आदी सर्व महत्त्वपूर्ण पदांवरील नियुक्त्या राष्ट्रपतीच्या सही-शिक्क्याने होतात. एवढेच नव्हे तर पंतप्रधानपदावरील व्यक्तीचा मृत्यू झाल्यास जोपर्यंत या दुःखद घटनेसंबंधीच्या निवेदनावर राष्ट्रपतीची स्वाक्षरी होत नाही, तोपर्यंत शासनातर्फे राष्ट्रीय शोकाची घोषणा केली जात नाही. तो भारतीयांना सणवार व राष्ट्रीय उत्सवांच्या प्रसंगी शुभेच्छा व संदेश देतो. थोडक्यात भारतीय शासनव्यवस्थेत राष्ट्रपतीचे पद अत्यंत महत्त्वपूर्ण आहे.

## राष्ट्रपती पदसाठीची पात्रता :-

राष्ट्रपतीपदासाठी निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराची पात्रता पुढीलप्रमाणे असावी लागते.

(i) तो भारताचा नागरिक असावा.

(ii) त्याने वयाची ३५ वर्षे पूर्ण केलेली असावीत.

(iii) लोकसभेचा सदस्य म्हणून निवडून येण्यास तो पात्र असावा. (याचा अर्थ लोकसभा सदस्यत्वासाठी अपात्रविषयक अटी पूर्ण करू न शकणारी व्यक्ती राष्ट्रपतीपदासाठी उमेदवार असु शकत नाही, असा होतो.)

(iv) केंद्रीय राज्य विधिमंडळाचा सदस्य नसावा. (निवडून येण्यापूर्वी संसदेचा, राज्य विधिमंडळाचा सदस्य असलेल्या व्यक्तीला राष्ट्रपतीपदाची शपथ ग्रहण करण्यापूर्वी राजीनामा द्यावा लागतो.)

(v) त्याने केंद्र किंवा घटकराज्य शासनाच्या नियंत्रणाखाली आर्थिक लाभपद धारण केलेले नसावे. (राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, मंत्री, राज्यपाल ही शासनाच्या नियंत्रणाखालील पदे समजली जात नाहीत. परंतु सरकारी कर्मचाऱ्याला राष्ट्रपतीपदासाठीच्या निवडणूकीत उभे राहण्यासाठी सरकारी नोकरीचा राजीनामा द्यावा लागतो, असा याचा अर्थ आहे.)

वर उल्लेखित अटी पूर्ण करणाऱ्या प्रत्येक भारतीय नागरिकाला निवडणुकीद्वारे राष्ट्रपती होण्याची समान संधी आहे.

## राष्ट्रपती पदाचा कार्यकाल :-

राष्ट्रपती पदाचा कार्यकाल **पाच** वर्षांचा असतो. राष्ट्रपतीपदासाठी निवडून आलेला उमेदवार ज्या दिवशी शपथ घेऊन राष्ट्रपतीचे पद ग्रहण करतो, त्या दिवसापासून ५ वर्षांचा कार्यकाल मोजला जातो. पाच वर्षांचा कार्यकाल पूर्ण झाल्यानंतरही राष्ट्रपतीची निवडणूक प्रक्रिया पूर्ण होऊन उमेदवार निवडून येई पर्यंत तो राष्ट्रपतीपदावर कायम राहतो. कार्यकाल समाप्त होण्यापूर्वी राष्ट्रपती राजीनामा देऊन पदत्याग करू शकतो. राष्ट्रपती या पदावर कार्य करणाऱ्या व्यक्तीच्या मृत्यूनंतर राष्ट्रपतीपद रिक्त झाले असे समझले जाते. कार्यकाल पूर्ण होण्यापूर्वी संसद त्याला महाभियोगाद्वारे पदच्युत करू शकते. कोणत्याही कारणाने राष्ट्रपतीचे पद रिक्त झाल्यास सहा महिन्यांच्या आत निवडणूक घ्यावी अशी तरतूद संविधानात आहे.

# राष्ट्रपतीची निवडणूक :-

अप्रत्यक्ष निवडणूक, निर्वाचक गण, एकल संक्रमणीय मतपद्धती, प्रमाणशीर प्रतिनिधित्वाचे तत्त्व, मतांचे मूल्य, आवश्यक मतांचा वाटा (कोटा) व निवडणुकीचे संचालन ह सर्व राष्ट्रपतीच्या निवडणुक प्रक्रियेची ठळक वैशिष्ट्ये आहेत. या वैशिष्ट्यांच्या आधारे राष्ट्रपतीची निवडणूक प्रक्रिया पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

**(१) अप्रत्यक्ष निवडणूक :-**

राष्ट्रपतीची निवड भारतीय नागरिकांतर्फे प्रत्यक्ष निवडणुकीद्वारे होत नाही. राष्ट्रपतीची निवडणूक अप्रत्यक्ष पद्धतीने होते. राष्ट्रपतीपदासाठी अप्रत्यक्ष निवडणूक पद्धती निश्चित करण्याची प्रमुख दोन कारणे पुढीलप्रमाणे आहेत.

(i) **विशाल लोकसंख्या :-** भारतात मतदारांची संख्या सुमारे ९० कोटी आहे. एवढया विशाल संख्येतील मतदारांतर्फे एका व्यक्तीची राष्ट्रपती म्हणून निवड करणे ही मोठ्या खर्चाची, गोंधळाची बाब ठरली असती.

(ii) **संसदीय शासनपद्धतीचा स्वीकार :-**

भारताने संसदीय शासनपद्धतीचा स्वीकार केला आहे. संसदीय शासनपद्धतीत राष्ट्रपती हा नाममात्र शासनप्रमुख असतो. पंतप्रधान व त्याचे मंत्रिमंडळ हेच वास्तविक शासनप्रमुख असतात. पंतप्रधान हा लोकसभेतील बहुमत प्राप्त करणाऱ्या पक्षाचा नेता असतो. बहुमत प्राप्त करणाऱ्या पक्षाच्या सदस्यांना जनतेने प्रत्यक्ष पद्धतीने निवडलेले असते. अशा परिस्थितीत राष्ट्रपतीची निवड जनतेद्वारे प्रत्यक्ष झाली तर लोकमताच्या पाठिंब्यामुळे तो नाममात्र शासनप्रमुख म्हणून कार्य करणे पसंत करणार नाही, म्हणून संसदीय शासनपद्धतीत नाममात्र शासनप्रमुख निवडण्यासाठी अप्रत्यक्ष निवडणूक पद्धती योग्य ठरते.

## (२) निर्वाचक गण (मंडळ) (Electoral College) :-

राष्ट्रपतीच्या निवडणुकीत मतदान करण्याचा अधिकार असलेल्या सर्व मतदारांचा समूह म्हणजे निर्वाचक गण (निर्वाचक मंडळ) होय. राष्ट्रपतीची निवड या निर्वाचक गणाद्वारेच होते. राष्ट्रपतींच्या निवडणुकीसाठी निर्माण केलेल्या निर्वाचक गणामध्ये पुढील सदस्यांचा समावेश होतो.

**(i) लोकसभेतील निर्वाचित सदस्य,**

**(ii) राज्यसभेतील निर्वाचित सदस्य,**

**(iii) सर्व घटकराज्यांच्या विधानसभेतील निर्वाचित सदस्य, आणि**

**(iv) सर्व केंद्रशासित प्रदेशांच्या विधानसभेतील निर्वाचित सदस्य.**

लोकसभा, राज्यसभा व विधानसभा यामधील नियुक्त सदस्यांचा समावेश राष्ट्रपतीच्या निवडणुकीतील निर्वाचक गणामध्ये होत नाही. राष्ट्रपती हा केंद्रीय कार्यकारी मंडळाचा प्रमुख आहे, म्हणून त्याच्या निवडणुकीत केंद्रस्तरावरील लोकप्रतिनिधींना सहभागी होण्याची संधी मिळणे आवश्यक ठरते. तसेच राष्ट्रपती देशाचा राष्ट्रप्रमुख आहे, म्हणून त्यांच्या निवडणुकीत घटकराज्य व केंद्रशासित प्रदेश या स्तरावरील लोकप्रतिनिधींना सहभागी होण्याची संधी मिळणे आवश्यक ठरते.

## (३) एकल संक्रमणीय मतपद्धती :-

राष्ट्रपतीच्या निवडणुकीत निर्वाचक गणात समावेश असलेल्या प्रत्येक सदस्यांना एकच मतपत्रिका मिळते. मतपत्रिकेवर राष्ट्रपतीपदासाठी निवडणुकीत उभे असलेल्या सर्व उमेदवारांची नावे असतात. त्यांच्या नावासमोर निवडणूक चिन्ह नसते. या निवडणुकीतील सर्व उमेदवारांचा पसंतिक्रम निश्चित करण्याचे मतस्वातंत्र्य निर्वाचक गणातील सदस्यांना असते. ते मतपत्रिकेवरील उमेदवारांच्या नावासमोर १, २, ३ असे क्रमांक लिहून स्वतःचाच पसंतिक्रम व्यक्त करतात. मतमोजणी करताना निवडणुकीतून बाद होणाऱ्या उमेदवारांना प्राप्त झालेल्या मतांचे पसंतिक्रमाच्या आधारे संक्रमण होते. सोप्या शब्दात मतमोजणी करताना बाद होणाऱ्या उमेदवारांची मते पसंतिक्रमाच्या आधारे अन्य उमेदवाराच्या प्रथम पसंतिक्रमाच्या मतांमध्ये मिळविली जातात. हे करण्यासाठी मतमोजणी करताना आवश्यक मतांचा वाटा (कोटा) सूत्राद्वारे निश्चित केला जातो.

**(४) प्रमाणशीर प्रतिनिधित्वाचे तत्व :-**

निवडणुकीत उभे असणाऱ्या उमेदवारांना मिळालेल्या मतदारांच्या पाठिंब्याच्या प्रमाणात प्रतिनिधित्व मिळावे, हे प्रमाणशीर प्रतिनिधित्वाच्या तत्वाचे उद्दिष्ट आहे. राष्ट्रपती हा राष्ट्रप्रमुख आहे. म्हणून त्याला घटकराज्यातील निर्वाचित विधानसभा सदस्यांचा पाठिंबा असणे आवश्यक ठरते. राष्ट्रपती हा केंद्रीय कार्यकारी मंडळाचा प्रमुख आहे. म्हणून त्याला निर्वाचित संसदसदस्यांचा पाठिंबा असणेही आवश्यक ठरते. अशाप्रकारे राष्ट्रपतीपदाच्या उमेदवाराला भिन्न हितसंबंधी गटांच्या पाठिंब्याची गरज आहे. म्हणून राष्ट्रपतीच्या निवडणुकीसाठी प्रमाणशीर प्रतिनिधित्वाच्या तत्वाचा व या तत्वावर आधारित एकल संक्रमणीय पद्धतीचा उपयोग करण्यात आला आहे.

**(५) मतांचे मूल्य :-** राष्ट्रपतीच्या निवडणुकीसाठी निर्माण केलेल्या निर्वाचक गणामध्ये **निर्वाचित संसदसदस्य** आणि **विधानसभांचे निर्वाचित सदस्य** ह्यांचा समावेश होतो. निर्वाचित संसदसदस्यांच्या एकूण संख्येपेक्षा घटकराज्ये व केंद्रशासित प्रदेश यामधील निर्वाचित विधानसभा सदस्यांची एकूण संख्या जास्त आहे. अशा परिस्थितीत प्रत्येक मताचे मूल्य समान असल्यास राष्ट्रपतीच्या निवडणुकीत विधानसभेच्या निर्वाचित सदस्यांचे आधिक्य निर्माण होईल. राष्ट्रपतीवर कार्य करताना मोठ्या आकाराच्या घटकराज्यांचा दबाव पडण्याची शक्यता निर्माण होते. ही स्थिती संघराज्य पद्धतीला घातक ठरते. ही स्थिती निर्माण होऊ नये, यासाठी राष्ट्रपतीच्या निवडणुकीत पुढील दोन सूत्रांचा उपयोग करून संसदसदस्य आणि विधानसभा सदस्यांच्या मतांचे मूल्य निश्चित केले जाते.

i) **त्या विधानसभेच्या प्रत्येक निर्वाचित सदस्याच्या एका मताचे मूल्य** = **त्या घटकराज्याची लोकसंख्या x १** / **त्या विधानसभेच्या निर्वाचित सदस्यांची संख्या x १०००**

ii) **संसदेच्या प्रत्येक निर्वाचित सदस्याच्या एका मताचे मूल्य** = **वरील सूत्रानुसार सर्व राज्यांमधील निर्वाचित सदस्यांना प्राप्त झालेली एकूण मते** / **लोकसभा व राज्यसभा यांच्यातील निर्वाचित सदस्यांची संख्या**

निर्वाचक गणामधील सदस्यांच्या मतांचे मूल्य ठरविण्यासाठी वर उल्लेखित दोन सूत्रांचा उपयोग केला जातो. या दोन सूत्रांमुळे निर्वाचित संसदसदस्य आणि सर्व घटकराज्यातील विधानसभेचे निर्वाचित सदस्य या दोन्ही गटांना समान स्वरूपाचे संख्यात्मक महत्त्व प्राप्त होते. तसेच एकल संक्रमणीय मतपद्धती व प्रमाणशीर प्रतिनिधित्वाचे तत्त्व यामुळे राष्ट्रपतीपद विभूषित करणाऱ्या व्यक्तीला जास्तीत जास्त मतदारांचा पाठिंबा मिळविणे शक्य होते.

**(६) आवश्यक मतांचा वाटा (कोटा) :-**

राष्ट्रपतीच्या निवडणुकीत एकल संक्रमणीय मतपद्धती व प्रमाणशीर प्रतिनिधित्वाच्या तत्त्वाचा उपयोग केला जातो. या निवडणूक पद्धतीमध्ये मतमोजणी करताना उमेदवार निवडून येण्यासाठी आवश्यक मतांचा वाटा पुढील सूत्राद्वारे निश्चित केला जातो.

$$\textbf{आवश्यक मतांचा वाटा (कोटा)} = \frac{\textbf{एकूण मतांची संख्या}}{\textbf{निवडावयाच्या प्रतिनिधींची संख्या} + १} + १$$

राष्ट्रपतीच्या निवडणुकीत उमेदवार निवडून येण्यासाठी **५० टक्के + १** हा आवश्यक मतांचा वाटा निश्चित होतो. म्हणजे स्पष्ट बहुमत मिळवावे लागते.

**(७) निवडणुकीचे संचालन :-**

राष्ट्रपतीच्या निवडणुकीचे संचालन **केंद्रीय निवडणूक आयोग** करते. संसदसदस्यांसाठी मतदान केंद्र दिल्ली असते. विधानसभा सदस्यांसाठी मतदान केंद्र घटकराज्याची व केंद्रशासित प्रदेशाची राजधानी असते. मतदान पूर्ण झाल्यावर सर्व घटकराज्यातील सीलबंद मतपेट्या देशाच्या राजधानीत आणण्यात येतात. मतमोजणीनंतर निकाल घोषित केला जातो.

राष्ट्रपतीची निवडणूक प्रक्रिया निर्वाचक गणामधील सदस्यांना मतदान करण्याच्या दृष्टीने सरळ व सोपी आहे. मतमोजणी करतानाच मतांचे मूल्य निश्चित करणे, आवश्यक मतांचा वाटा काढणे या निवडणूक प्रक्रियेतील गुंतागुंतीच्या बाबी घडतात.

# महाभियोगाची प्रक्रिया :-

राष्ट्रपती पाच वर्षांच्या निश्चित कार्यकाळासाठी निवडला जातो. राष्ट्रपतीचे पद हे सर्वोच्च पद आहे. यामुळे पाच वर्षांचा कालावधी पूर्ण होण्यापूर्वी आपणास पदत्याग करावयास कोणीही भाग पाडू शकत नाही, अशी स्थिती निर्माण होणे हे अंतिमरीत्या लोकशाही पद्धतीला घातक ठरते. कारण अशी स्थिती निर्माण झाल्यास सर्वोच्च पदावर कार्य करणारी व्यक्ती बेजबाबदार बनू शकते. सर्वोच्च पदावरील व अन्य सर्व उच्च पदांवरील व्यक्तीने गंभीर स्वरूपाचा गुन्हा केल्यास तिला पदच्यूत करण्यासाठी कोणती तरी एक निश्चित पद्धती असणे आवश्यक ठरते. या पद्धतीलाच **महाभियोगाची पद्धती** असे संबोधिले जाते. राष्ट्रपतीपदासाठी संविधानाने महाभियोगाचा अधिकार संसदेला दिला आहे. सर्वोच्च पदावरील व्यक्तीला पदच्यूत करावयासाठी महाभियोगाची पद्धती कठीण असणे आवश्यक ठरते. अन्यथा या पद्धतीचा दुरुपयोग केला जाण्याची शक्यता असते. यामुळे सर्वोच्च पदावरील व्यक्तीला स्वतंत्र व निर्भयपणे कार्य करणे कठीण होऊ शकते. या सर्व गोष्टींचा विचार करून भारतीय संविधानात राष्ट्रपतीला पदच्यूत करण्यासाठी महाभियोगाच्या प्रक्रियेची तरतूद पुढीलप्रमाणे करण्यात आली आहे.

(१) राष्ट्रपतीवर घटनाभंग हा गंभीर आरोप असणारा ठराव **१४ दिवसांच्या पूर्वसूचनेने** संसदेच्या कोणत्याही सभागृहात मांडता येतो. लोकसभेत किंवा राज्यसभेत हा महाभियोगाचा ठराव मांडण्यासाठी त्यावर सभागृहाच्या किमान **१/४** सदस्यांच्या सह्या असणे आवश्यक आहेत.

(२) हा महाभियोगाचा ठराव संसदेच्या ज्या सभागृहात मांडण्यात आला, त्या सभागृहाने एकूण सदस्यसंख्येच्या **२/३** बहुमताने तो मंजूर करणे आवश्यक आहे.

(३) महाभियोगाचा ठराव संसदेच्या एका सभागृहाने २/३ बहुमताने मंजूर केला, तरच दुसऱ्या सभागृहात तो चर्चेसाठी पाठविला जातो.

(४) हा ठराव एका सभागृहाने मंजूर केल्यानंतर संसदेच्या दुसऱ्या सभागृहात राष्ट्रपतीविरुद्ध महाभियोगाचा खटला सुरू होईल. ठरावामधील आरोपांची सभागृह चौकशी करील. राष्ट्रपती स्वतः अथवा आपल्या प्रतिनिधिमार्फत आपली बाजू मांडू शकतो. चौकशीअंति संसदेच्या दुसऱ्या सभागृहाने एकूण सदस्यसंख्येच्या **२/३** बहुमताने हा ठराव मंजूर केला तर तो ठराव मंजूर झाला, त्या दिवसापासून राष्ट्रपती पदमुक्त (पदच्यूत) झाल्याचे समजले जाईल.

# राष्ट्रपतीचे अधिकार व कार्ये

राष्ट्रप्रमुख या नात्यात राष्ट्रपतीला व्यापक स्वरूपाचे अधिकार प्राप्त झाले आहेत. ते पुढील प्रमाणे सांगता येतील.

## 1)प्रशासनविषयक किवा कार्यकारी अधिकार व कार्ये :-

संविधानानुसार भारत सरकारच्या सर्व कार्याची अंमलबजावणी राष्ट्रपतीच्या नावे केली जाते. भारत सरकारचे सर्व आदेश राष्ट्रपतीच्या नावे दिले जातात. केंद्रीय कार्यकारी मंडळाचा प्रमुख म्हणून राष्ट्रपतीला पुढील प्रशासकीय कार्य करावी लागतात.

### i) नियुक्ती करण्याचा अधिकार :-

राष्ट्रपती बहुमत प्राप्त असलेल्या पक्षाच्या नेत्याला पंतप्रधान म्हणून नियुक्ती करतो. पंतप्रधानाच्या सल्ल्याने तो मन्त्रिपरिषदेतील इतर मंत्र्यांची नियुक्ती करतो. तसेच त्यांच्यामध्ये खाते किवा विभागाचे वितरण (वाटप) करतो. याशिवाय सर्वोच्च व उच्च न्यायालयाचे न्यायाधीश, राज्यपाल, मुख्य निर्वाचन आयुक्त, भारताचा नियंत्रक व महालेखापरीक्षक, भारत सरकारचा महान्यायवादी, अनुसूचित जाती व जमातीसाठीचे विशेष अधिकारी, भाषा आयोग, वित आयोग, केंद्रीय लोकसेवा आयोग, केंद्रीय विविध चौकशी आयोग (उदा. शहा आयोग) यासारख्या केंद्रस्तरावरील सर्व आयोगाचे अध्यक्ष व सदस्य या सर्वांची नियुक्ती करण्याचा अधिकार राष्ट्रपतीलाच आहे. या सर्वांची पदच्युती करण्याचा अधिकार राष्ट्रपतीलाच आहे. राष्ट्रपती अनेक महत्वपूर्ण पदावर व्यक्तीची नियुक्ती करतो व त्यांच्या मदतीने तो राज्यकारभार चालवितो. वरील सर्व नियुक्त्या राष्ट्रपतीला स्वतःच्या सही-शिक्क्यानेच कराव्या लागतात. संसदीय पद्धतीनुसार या सर्व नियुक्त्या तो पंतप्रधान व त्यांच्या मंत्रिमंडळाच्या सल्ल्यानुसार करतो.

### ii) शासनाला मार्गदर्शन करण्याचे कार्य :-

देशाचा कारभार राष्ट्रपतीच्या नावाने सुरू असतो. म्हणून त्याला पंतप्रधान, मंत्रीमंडळाकडून शासनासंबंधी सर्व माहिती प्राप्त करण्याचा आधिकार आहे. पतप्रधानांनी राष्ट्रपतीची भेट घेतली, असे वृत्त आपण प्रसारमाध्यमातून ऐकतो किवा वाचतो.या भेटीत पंतप्रधान राष्ट्रपतीला राज्यकारभारासंबंधीची सर्व महत्त्वाची माहिती देत असतो. मंत्रिमंडळाने दिलेल्या सल्ल्यात काही कमतरता असेल, तर तो सल्ला मंत्रिमंडळाकडे पुनर्विचारासाठी राष्ट्रपती पाठवू शकतो. पुनर्विचार करून मंत्रिमंडळ जो सल्ला देईल, तो राष्ट्रपतीना मान्य करावाच लागतो. थोडक्यात, मंत्रिमंडळाला आपल्या निर्णयांचा पुनर्विचार करावयाच्या लावण्याचा आणि मंत्रिमंडळाकडून सर्व माहिती प्राप्त करण्याचा हे दोन महत्त्वाचे अधिकार राष्ट्रपतीला आहेत. राष्ट्रीय महत्वाच्या प्रश्नांवर पंतप्रधान राष्ट्रपतीशी विचारविनिमय करतो.म्हणून राष्ट्रपतीचे शासनाला मार्गदर्शन करण्याचे कार्य महत्त्वपूर्ण ठरते.

### (iii) परराष्ट्र धोरणाविषयक कार्य:-

अमेरिका, इंग्लंड, चीन, पाकिस्तान, श्रीलंका इत्यादी देशांशी भारताने कोणते धोरण ठेवायचे? ते ठरविण्याचे कार्य केंद्रीय कार्यकारी मंडळ याचे आहे. हे कार्य करण्यासाठी राष्ट्रपतींना आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये भारताचे प्रतिनिधित्व करण्याचा अधिकार आहे. भारत सरकारच्या वतीने परदेशात राजदूत नियुक्त करण्याचा अधिकार आहे. तसेच भारतात परदेशांनी नव्याने नियुक्त केलेल्या राजदूतांच्या ओळखपत्रांचा स्विकार करण्याचा अधिकार आहे. परदेशांना भेट देऊन भारतात परत आल्यानंतर पंतप्रधान भेट घेतात व त्यांना परराष्ट्रातील नेत्यांशी केलेल्या चर्चेसंबंधीची व करारासंबंधीची माहिती देत असतात.

अशाप्रकारे विभिन्न पदावर नियुक्त्या करून त्यांच्या मदतीने राष्ट्रपती आपले शासनविषयक कार्ये पार पाडीत असतो.

## (२) विधिविषयक अधिकार व कार्ये :-

राष्ट्रपती, लोकसभा व राज्यसभा मिळून संसद तयार झाली आहे, असे भारतीय संविधानातील ७९ व्या कलमात स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे राष्ट्रपतीला विधिविषयक व्यापक स्वरूपाचे अधिकार पुढीलप्रमाणे प्राप्त होतात.

### (i) संसदेच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन आमंत्रित करणे:-

राष्ट्रपती संसदेच्या दोन्ही सभागृहांना वर्षातून किमान दोन वेळा आमंत्रित करण्याचे कार्य करतो. सभागृहांच्या अधिवेशनाची (सत्राची) समाप्ती करण्याचा अधिकारही त्याला आहे. विधिनिर्माण प्रक्रियेत निर्माण झालेला गतिरोध दूर करण्यासाठी दोन्ही सभागृहांचे संयुक्त अधिवेशन बोलाविण्याचा त्याला अधिकार आहे. लोकसभेचे मुदतपूर्व विसर्जन करण्याचा अधिकार त्याला आहे. राष्ट्रपती हे सर्व अधिकार पंतप्रधान व त्यांच्या मंत्रिमंडळाच्या सल्ल्यानुसार वापरतो.

### (ii) संसदेत भाषण देण्याचा अधिकार :-

राष्ट्रपती संसदसदस्य नाही, तथापि त्याला संयुक्त अधिवेशनात किंवा संसदेच्या कोणत्याही सभागृहाच्या बैठकीत अभिभाषण देण्याचे कार्य करावे लागते. राष्ट्रपतीचे अभिभाषण मंत्रिमंडळाने तयार केलेले असते.

### (iii) अध्यादेश (वटहुकूम) काढण्याचा अधिकार:-

संसदेचे अधिवेशन सुरू नसताना राष्ट्रपतींना अध्यादेश काढण्याचा अधिकार आहे. राष्ट्रपतीचा हा महत्त्वपूर्ण विधिविषयक अधिकार आहे. कारण राष्ट्रपतींनी काढलेल्या अध्यादेशांना संसदेच्या कायद्यासारखाच दर्जा असतो. संसदेचे अधिवेशन सुरू झाल्यानंतर राष्ट्रपतींनी काढलेला प्रत्येक अध्यादेश संसदेसमोर ठेवण्यात येतो. संसदेने जर त्याला मंजुरी दिली तर त्याचे कायद्यात रूपांतर होते, अन्यथा तो समाप्त झाला असे समजले जाते. संसदेचे अधिवेशन सुरू झाल्यानंतर राष्ट्रपतींनी काढलेला अध्यादेश सहा आठवडे प्रभावी राहू शकतो.

**(iv)संसदेने मंजूर केलेल्या विधेयकांबाबत नकाराधिकार (Veto) :-**

राष्ट्रपतीचा हा महत्वाचा विधिविषयक अधिकार आहे. कारण संसदेने मंजूर केलेल्या विधेयकावर जोपर्यंत राष्ट्रपतीची स्वाक्षरी होत नाही, तोपर्यंत विधिनिर्मितीची प्रक्रिया पूर्ण झाली असे समजले जात नाही. संसदेने मंजूर केलेले विधेयक अस्वीकृत करण्याचा (फेटाळण्याचा) अधिकार राष्ट्रपतीला आहे. यालाच राष्ट्रपतीचा नकाराधिकार असे म्हणतात. परंतु त्याला अंतिम स्वरूपाचा नकाराधिकार नाही. तो संसदेने मंजूर केलेल्या विधेयकासंबंधी काही सूचना करून ते संसदेकडे पुनर्विचारार्थ पाठवितो. ह्या सूचना मान्य केल्याच पाहिजे असे बंधन संसदेवर नाही. विधेयकासंबंधी राष्ट्रपतीने केलेल्या सूचना संसद फेटाळू शकते. राष्ट्रपतीने सूचना करून परत पाठविलेले किंवा फेटाळलेले विधेयक संसद मूळ स्वरूपात पुन्हा दुसऱ्यांदा मंजूर करू शकते. संसदेने ते विधेयक दुसऱ्यांदा पारित केले तर त्या विधेयकाला संमती देण्याचे कार्य राष्ट्रपतीला करावेच लागते. म्हणून विधेयकाबाबत राष्ट्रपतीचा नकाराधिकार अंतिम स्वरूपाचा नाही, असे म्हणता येते.

**(v) संसदेत विधेयक सादर करण्यासाठी राष्ट्रपतींची पूर्वसंमती :-**

अर्थविधेयक, घटकराज्याचे नाव किंवा सीमा बदलविणारे विधेयक राष्ट्रपतीच्या पूर्वसंमतीशिवाय संसदेत मांडले जाऊ शकत नाही.

**(vi) राज्यपालाद्वारे प्रस्तुत करण्यात आलेल्या विधेयकांना मंजुरी देण्याचा अधिकार :-**

राज्य विधिमंडळांनी विधेयक पारित केल्यानंतर ते मंजुरीसाठी त्या घटकराज्याच्या राज्यपालाकडे जाते. घटकराज्याचा राज्यपाल ते विधेयक स्वतः मंजूर न करता संमतीसाठी राष्ट्रपतीकडे पाठवू शकतो. अशा विधेयकाला जर राष्ट्रपतींनी संमती नाकारली, तर त्या विधेयकाचे कायद्यात रूपांतर होऊ शकत नाही. राज्यपालाने प्रस्तुत विधेयकाबाबत राष्ट्रपतीला अंतिम स्वरूपाचा नकाराधिकार आहे.

**(vii) संसदेच्या सभागृहात सदस्यांची नियुक्ती करण्याचा अधिकार :-**

राष्ट्रपतीला लोकसभेत अँग्लोइंडियन गटाला पुरेसे प्रतिनिधित्व देण्यासाठी या गटाचे दोन सदस्य नियुक्त करण्याचा अधिकार आहे. तसेच राज्यसभेत १२ सदस्यांची नियुक्ती करण्याचा अधिकार आहे. तो पंतप्रधान व मंत्रिमंडळाच्या सल्ल्यानुसार हे कार्य करतो.

अशाप्रकारे राष्ट्रपतीला विधिविषयक व्यापक स्वरूपाचे अधिकार आहेत. म्हणून राष्ट्रपती हे संसदेचे तिसरे सभागृह किंवा संसदेचे अदृश्य सभागृह आहे, असे म्हटले जाते.

**(३) न्यायविषयक कार्ये व अधिकार :-**

(i) सर्वोच्च आणि उच्च न्यायालयातील न्यायाधीशांची नियुक्ती करण्याचा अधिकार राष्ट्रपतीला आहे. त्यांना पदाची शपथ देण्याचे कार्य तो करतो. (in) तो सर्वोच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांचा सल्ला घेऊन उच्च न्यायालयातील न्यायाधीशांचे स्थानांतर (बदली) करतो (iii) कोणत्याही घटनात्मक बाबतीत किंवा कायद्याच्या बाबतीत सर्वोच्च न्यायालयाचा सल्ला मागण्याचा अधिकार राष्ट्रपतीला आहे. (iv) सर्वोच्च राष्ट्रप्रमुख म्हणून राष्ट्रपतीला देहांताची शिक्षा (फाशीची शिक्षा) कमी करण्याचा किंवा माफ करण्याचा अधिकार आहे. याला राष्ट्रपतीचा क्षमादानाचा (दयेचा) अधिकार असे म्हणतात.

**(४) आर्थिक स्वरूपाची कार्य व अधिकार:-**

लोकसभेत अर्थ विधेयक मांडण्यास पूर्वसंमती देणे,वित्त आयोगाची नियुक्ती करणे, एखाद्या घटक राज्याला आवश्यकता पडल्यास संचित निधीतून पैसे देणे, सहायक अनुदाने व अपवादात्मक अनुदाने मिळविण्यासाठी मागण्या ठेवणे इत्यादी आर्थिक बाबी राष्ट्रपतीच्या अधिकारात असतात. करांद्वारे वसूल झालेली रक्कम संसद व राष्ट्रपतीच्या संमतीने खर्च करावी लागते.

**(५) लष्करविषयक अधिकार व कार्ये :-**

राष्ट्रपती भारतीय सैन्याचा सर्वोच्च सेनापती आहे. म्हणजे तो भूदल, वायुदल व नौदल अशा लष्करातील तीनही दलांचा सेनापती आहे. लष्कराचा सरसेनापती म्हणून राष्ट्रपतीला व्यापक स्वरूपाचे अधिकार प्राप्त होतात. उदा. (1) राष्ट्रपतींना लष्करातील तीनही दलांच्या प्रमुखांची व इतर प्रमुख अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्याचा अधिकार आहे. (ii) लष्करप्रमुख या नात्याने शत्रु राष्ट्राशी भारताचे युद्ध किंवा शांती करार घोषित करण्याचा अधिकार आहे. (iii) शत्रु राष्ट्राशी सुरु असणारे युद्ध थांबविण्याचाही त्याला अधिकार आहे. परराष्ट्रांशी लष्करी करार करण्याचा किंवा केलेले लष्करी करार मोडण्याचा अधिकार राष्ट्रपतीला आहे. लष्करी कराराच्या संदर्भात राष्ट्रपतींनी केलेल्या प्रत्येक कृतीला संसदेची संमती प्राप्त होणे आवश्यक आहे. राष्ट्रपती सर्व अधिकारांचा उपयोग पंतप्रधान व त्यांच्या मंत्रिमंडळाच्या सल्ल्यानुसार करतो.

## (६) आणीबाणीविषयक अधिकार:-

देशात निर्माण झालेल्या संकटांचा किंवा असाधारण परिस्थितीचा शासनव्यवस्थेला मुकाबला करता यावा, यासाठी राष्ट्रपतीला काही विशेष अधिकार संविधानाने दिलेले आहेत. या विशेष अधिकारांना राष्ट्रपतीचे आणीबाणीविषयक अधिकार असे म्हणतात. आणीबाणीविषयक अधिकारामुळे केंद्र सरकारच्या सत्तेत व कार्यामध्ये बरीच मोठी वाढ होते. त्यामुळे शासनाला संकटांचा मुकाबला करणे शक्य होते. म्हणून राष्ट्रपतीचे आणीबाणीविषयक अधिकार महत्त्वपूर्ण ठरतात. घटनाकारांनी तीन वेगवेगळ्या प्रकारची संकटे किंवा असाधारण परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन राष्ट्रपतीला आणीबाणीविषयक तीन प्रकारचे अधिकार दिलेले आहेत.

### (i) राष्ट्रीय आणीबाणी :-

युद्ध, परचक्र, परदेशाचे आक्रमण किवा देशांतर्गत सशस्त्र उठाव यामुळे देशाच्या सुरक्षिततेला गंभीर स्वरूपाचा धोका निर्माण झाला आहे, अशी राष्ट्रपतीची खात्री झाल्यास तो राष्ट्रीय आणीबाणी घोषित करू शकतो. राष्ट्रपतीने केलेल्या राष्ट्रीय आणीबाणीच्या घोषणेला संसदेच्या दोन्ही सभागृहांची २/३ बहुमताने मान्यता देणे आवश्यक आहे. राष्ट्रीय आणीबाणीला संसदेने मान्यता न दिल्यास एक महिन्याच्या मुदतीनंतर ती प्रभावशून्य होते. केंद्रीय मंत्रिमंडळाने लेखी निर्णय दिल्याशिवाय राष्ट्रपती राष्ट्रीय आणीबाणी घोषित करू शकत नाही. राष्ट्रीय आणीबाणीच्या मुदतीत एकावेळी फक्त सहा महिन्यांनीच वाढ केली जाऊ शकते. राष्ट्रीय आणीबाणीच्या घोषणेमुळे केंद्र सरकारच्या अधिकारात वाढ होते. उदा. 1) नागरिकांचे मूलभूत अधिकार स्थगित होतात. (ii) संसदेला राज्यसूचीतील विषयांवरही कायदा करता येतो. (iii) राज्य सरकारांनी आपली सत्ता कोणत्या प्रकारे वापरावी याबाबत निर्देश देण्याचा अधिकार केंद्र सरकारला प्राप्त होतो. (iv) घटकराज्यांच्या आर्थिक अधिकारांवर मर्यादा घालण्याची सत्ता केंद्र सरकारला प्राप्त होते. (v) कराच्या उत्पन्नाची केद्र सरकार आणि राज्य सरकार यांच्यामध्ये जी विभागणी झालेली आहे, तिच्यात बदल केला जाऊ शकतो. थोडक्यात, राष्ट्रीय आणीबाणी घोषित झाल्यास केंद्र सरकारच्या सत्तेत इतकी वाढ होते की, संघात्मक राज्याचे रूपांतर एककेंद्री राज्यात होते, असे म्हटले जाते. १९६२ मधील चीनच्या आक्रमणामुळे निर्माण झालेले युद्ध, १९६५ व १९७१ मधील भारत-पाकिस्तान युद्ध या दोन्ही युद्धामुळे राष्ट्रीय आणीबाणी घोषित केली होती. अंतर्गत बंडाळी आणि शांततेस धोका या कारणांसाठी २६ जून १९७५ रोजी राष्ट्रीय आणीबाणी घोषित करण्यात आली होती.

**(ii) राज्य आणीबाणी :-**

मंत्रिमंडळ, विधानसभा यासारख्या सांविधानिक यंत्रणा घटकराज्यातील राज्यकारभारासाठी निर्माण केल्या आहेत. एखाद्या घटकराज्यातील सांविधानिक (घटनात्मक) यंत्रणा कोसळली आहे, अशी राज्यपालांच्या अहवालावरून किंवा अन्य मार्गाने राष्ट्रपतीची खात्री झाल्यास तो (संघराज्यप्रमुख या नात्याने) संबंधित राज्याचे प्रशासन स्वतःकडे घेऊ शकतो. यालाच राज्य आणीबाणी किंवा राष्ट्रपतीची राजवट असे म्हटले जाते. पंतप्रधान व मंत्रिमंडळाच्या सल्ल्यानेच राष्ट्रपती राज्य आणीबाणीची घोषणा करतो. राज्य आणीबाणीला दोन महिन्याच्या आत संसदेच्या दोन्ही सभागृहांची साध्या बहुमताने मान्यता आवश्यक आहे. राज्य आणीबाणी प्रथम सहा महिन्यांच्या कालावधीसाठी लावता येते. राज्य आणीबाणीची घोषणा करण्यात आली तेव्हा किंवा पुढील एक महिन्याचा कालावधी संपण्यापूर्वीच लोकसभेचे विसर्जन झालेले असेल तर राज्यसभेने राज्य आणीबाणीला मान्यता देणारा ठराव पारित (मंजूर) केला पाहिजे. अशा परिस्थितीत सार्वत्रिक निवडणुकीत होणाऱ्या लोकसभेच्या पहिल्या अधिवेशनात त्याला मान्यता दिली पाहिजे. लोकसभेने अशी मान्यता न दिल्यास ती राज्य आणीबाणीची घोषणा रद्द झाली आहे, असे समजले जाईल.

राज्य आणीबाणीच्या घोषणेमुळे केंद्र सरकारच्या सत्तेत व अधिकारात वाढ होते. उदा. (i) राज्य सरकारची सर्व कार्य (उच्च न्यायालयाचे कार्य सोडून) राष्ट्रपती स्वतःकडे किवा राज्यपालाकडे सोपवू शकतो. (ii) राज्य विधिमंडळाचे अधिकार संसदेला प्राप्त होतात. (iii) संचित निधीतून कोणताही खर्च करण्याची परवानगी राष्ट्रपती देऊ शकतो. (iv) उच्च न्यायालया व्यतिरिक्त राज्यातील इतर सर्व अधिकाऱ्याची कार्ये राष्ट्रपती आपल्याकडे घेऊ शकतो.

थोडक्यात राज्य आणीबाणी घोषित झाल्यानंतर केंद्र सरकारच्या सत्तेत वाढ होते. ३५६ कलमान्वये राज्य आणीबाणीची घोषणा आजवर अनेकदा करण्यात आली आहे. केंद्र शासनातील सत्तारूढ राजकीय पक्ष आपल्या राजकीय स्वार्थासाठी राज्य आणीबाणी घोषित करण्याच्या अधिकाराचा दुरुपयोग करतो, अशी टीका केली जाते.

**(iii) आर्थिक आणीबाणी :-**

भारतात किंवा भारताच्या एखाद्या भागात आर्थिक पत किंवा स्थैर्याला धोका निर्माण झाला आहे, अशी राष्ट्रपतीची खात्री झाल्यास त्याला आर्थिक संकटाची घोषणा करण्याचा अधिकार आहे. याला आर्थिक आणीबाणी असे म्हणतात. पंतप्रधान व मंत्रिमंडळाच्या सल्ल्यानेच राष्ट्रपती आर्थिक आणीबाणीची घोषणा करतात. आर्थिक आणीबाणीच्या काळात सर्वोच्च व उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांसह सर्व केंद्रीय कर्मचार्यांच्या वेतनभत्त्यात कपात करण्याचा अधिकार राष्ट्रपतीला आहे. राज्य शासनावर अर्थिक निर्बंध लावण्याचा अधिकार राष्ट्रपतीला प्राप्त होतो. संविधान अमलात आल्यापासून आजपर्यंत आर्थिक आणीबाणीची घोषणा करण्यात आली नाही.

# पंतप्रधान

पंतप्रधान व त्यांचे मंत्रिमंडळ वास्तविक कार्यकारी प्रमुख आहे. मंत्रिमंडळातील अन्य मंत्र्यांप्रमाणेच पंतप्रधानदेखील एक मंत्री आहे. पंतप्रधान मंत्रिमंडळाचा नेता असला तरीही राजकीय धोरण ठरविणे व निर्णय घेण्याचे कार्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत होते. म्हणूनच संसदीय शासनव्यवस्थेला मंत्रिमंडळीय शासनव्यवस्था असेही संबोधिले जाते. काही राजकीय अभ्यासकांच्या मते, भारतातील विद्यमान शासनव्यवस्था संसदीय नाही, मंत्रिमंडळीय सुद्धा उरलेली नाही, तर ती आता प्रधानमंत्रीय शासनव्यवस्था झाली आहे. राजकीय निरीक्षकांच्या या विचारांचे स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे करता येईल.

## पंतप्रधानाची नियुक्ती व निवड :-

लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर लोकसभेत ज्या पक्षाला बहुमत प्राप्त होतो, त्या पक्षाच्या नेत्याला राष्ट्रपती शपथविधी करिता आमंत्रित करतो. कोणत्याच पक्षाला बहुमत प्राप्त झाले नसेल तर एकापेक्षा अधिक पक्ष मिळून बनलेल्या युती किवा आघाडीच्या नेत्याला राष्ट्रपती शपथविधी करिता आमंत्रित करतो. युती किवा आघाडी बनणे शक्य नसेल तर सर्वाधिक जागा मिळविणाऱ्या पक्षाच्या नेत्याला राष्ट्रपती शपथविधी करिता आमंत्रित करतो. पंतप्रधान व त्याच्या सल्ल्यानुसार निवडलेल्या मंत्रिमंडळाला राष्ट्रपती शपथ देतो.

## पंतप्रधानाचा कार्यकाल :-

सार्वत्रिक निवडणुकीनंतर गठित होणाऱ्या नवीन लोकसभेच्या कार्यकालाएवढाच पंतप्रधानाचाही कार्यकाल असतो. लोकसभेचा कार्यकाल पाच वर्षांचा असल्यामुळे पंतप्रधान **पाच** वर्षांसाठी निवडला व नियुक्त केला जातो, असे म्हणता येते. **परंतु** सत्तारूढ पक्ष आपला नेता बदलवू शकतो. तसेच लोकसभेत अविश्वासाचा ठराव मंजूर होताच पंतप्रधानाला पदत्याग करावा लागतो.

## पंतप्रधानाचे अधिकार व कार्य :-

संविधानानुसार पंतप्रधानपदाला कोणतेही विशेष अधिकार प्राप्त होत नाहीत, कारण राज्यकारभाराचे धोरण व निर्णय ठरविण्याचा अधिकार एकट्या पंतप्रधानाला नसून मंत्रिमंडळाला आहे. मंत्रिमंडळ सामान्यपणे एकमताने निर्णय घेते. असे असूनही पुढील तीन कार्य करण्याची सत्ता पंतप्रधानपदाची आहे, असा राजकीय संकेत संसदीय शासनव्यवस्थेत प्रस्थापित झाला आहे.

(i) मंत्रिपरिषद व मंत्रिमंडळामध्ये कोणकोणत्या सहकार्याचा समावेश करावा, हे ठरविण्याचा अधिकार पंतप्रधानाचा आहे. तसेच पंतप्रधान कोणत्याही सहकारी मंत्र्याचा राजीनामा मागू शकतो. याचा अर्थ **मंत्रिपरिषद व मंत्रिमंडळाची रचना** करण्याचा अधिकार हा पंतप्रधानाचा वैयक्तिक अधिकार आहे, असे संसदीय शासनव्यवस्थेतील प्रथेनुसार समजले जाते.

(ii) मंत्रिपरिषद व मंत्रिमंडळाच्या सदस्यांमध्ये **खातेवाटप** करण्याचा अधिकार हा पंतप्रधानाचा वैयक्तिक अधिकार होय, असे समजले जाते. प्रशासनाच्या सोयीसाठी एखादे नवीन खाते निर्माण करण्याचा अधिकार पंतप्रधानाला आहे. वर उल्लेखित दोन्ही अधिकारांमुळेच मंत्रिमंडळात व मंत्रिपरिषदेत फेरबदल करण्याची सत्ता पंतप्रधानाला प्राप्त होते, पंतप्रधानाची इच्छा असेल, तरच मंत्रिमंडळात उपपंतप्रधानाचे पद निर्माण केले जाते.

(iii) पंतप्रधानाला कोणत्याही शासकीय खात्याशी संबंधित **माहिती प्राप्त करण्याचा** व **कागदपत्रे मागविण्याचा** अधिकार आहे. पंतप्रधानाच्या या वैयक्तिक अधिकारामुळे त्यांचे संपूर्ण प्रशासनावर नियंत्रण प्रस्थापित होते. अशाप्रकारे पंतप्रधानाला संपूर्ण प्रशासनावर नियंत्रण ठेवण्याचा अधिकार आहे. प्रत्येक खात्याच्या मंत्र्याला त्याच्या खात्याशी संबंधित असणाऱ्या महत्त्वपूर्ण बाबींबाबत पंतप्रधानाशी विचारविनिमय करावा लागतो. सामान्यपणे पंतप्रधानाकडे कोणतेही एक खाते नसते, तरीही या वैयक्तिक अधिकारामुळे पंतप्रधानाला सर्व शासकीय खात्यांमधील महत्त्वपूर्ण बाबींची माहिती असते.पंतप्रधानाला प्रशासनावर नियंत्रण ठेवण्याचे कार्य करण्यासाठी अनेक सल्लागार व ज्येष्ठ सनदी अधिकारी सहाय्य करीत असतात. या सर्व कार्यांसाठी पंतप्रधानाचे सचिवालय (पी.एम.ओ. कार्यालय) असते. शासनाच्या विभिन्न खात्यांमधील महत्त्वपूर्ण निर्णयाशी संबंधित फाईल (कागदपत्रे) पंतप्रधानाच्या सचिवालयात प्रत्येक खात्यातर्फे पाठविल्या जातात किंवा पंतप्रधानाचे सचिवालय गृहखाते, संरक्षण खाते अशा कोणत्याही खात्याकडून कोणतीही महत्त्वपूर्ण फाईल मागवू शकते. पंतप्रधानाचे विश्वासू सल्लागार व वरिष्ठ सनदी अधिकारी त्या फाईलमधील प्रश्न वा समस्यांची सोडवणूक करण्यासाठी कोणकोणते पर्याय योग्य ठरू शकतात याबाबत पंतप्रधानाला सल्ला देतात. पंतप्रधानाची स्वाक्षरी होऊन मंजुरी मिळाल्यानंतर ती फाईल पुन्हा संबंधित खात्याकडे पाठविली जाते. त्यानंतरच निर्णयाची अंमलबजावणी खात्यातर्फे केली जाते.

अशाप्रकारे पंतप्रधानाला सल्लागार व ज्येष्ठ सनदी अधिकारी यांच्या सहाय्याने संपूर्ण प्रशासनावर (सर्व खात्यांच्या कारभारावर) नियंत्रण ठेवणे शक्य होते.संसदीय शासनव्यवस्थेत पंतप्रधानाला वर उल्लेखित तीन कार्ये करण्याची सत्ता किंवा अधिकार आहेत, अशी राजकीय प्रथा प्रस्थापित झाल्यामुळे पंतप्रधानाचे पद महत्त्वपूर्ण झाले आहे. पंतप्रधान मंत्रिमंडळरूपी कमानीची आधारशिला आहे. किंवा पंतप्रधान हा सूर्य आहे, त्याच्याभोवती मंत्रीरूपी ग्रह फिरत असतात, यासारख्या उपमांद्वारे पंतप्रधानाच्या मंत्रिमंडळातील स्थानाचे महत्त्व राजकीय निरीक्षकांनी प्रतिपादित केले आहे. पंतप्रधानाचे मंत्रिमंडळातील स्थान व भूमिका केंद्रीय मंत्रिमंडळातच नव्हे, तर देशाच्या राजकारणातही पंतप्रधानाचे स्थान महत्त्वपूर्ण आहे. पंतप्रधानाचे वैयक्तिक अधिकार व मंत्रिमंडळाची कार्यपद्धती या दोन घटकांमुळे संसदीय शासनव्यवस्थेत पंतप्रधानाचे पद सर्वात महत्त्वपूर्ण झाले आहे. देशाच्या राजकारणात व केंद्रीय मंत्रिमंडळात पंतप्रधानाचे स्थान व भूमिका महत्त्वपूर्ण होण्यास पुढील घटक कारणीभूत ठरतात.

(i) **पंतप्रधानाला मंत्रिमंडळाच्या जडणघडणीचे अधिकार आहेत :-** पंतप्रधान बहुमत असणाऱ्या पक्षाचा नेता असतो. मंत्रिमंडळात कोणाला घ्यायचे? कोणाला कोणते खाते द्यायचे ? कॅबिनेट मंत्री, राज्यमंत्री, उपमंत्री यापैकी कोणता दर्जा कोणाला द्यावयाचा? या सर्व बाबी पंतप्रधानाच्या अखत्यारीत येतात. मंत्र्यांची खाती बदलविण्याचा व त्यांचा राजीनामा मागण्याचा अधिकार पंतप्रधानाला आहे. थोडक्यात, पंतप्रधानाला मंत्रिपरिषदेची जडणघडण करण्याचा अधिकार आहे. पंतप्रधान हाच मंत्रिमंडळाचा निर्माता होय, असे म्हटले जाते. यामुळेच त्याचे मंत्रिमंडळातील स्थान महत्त्वपूर्ण ठरते.

(ii) **पंतप्रधान मंत्रिमंडळाचा नेता आहे :-** मंत्रिमंडळाची बैठक केव्हा घ्यावयाची ? कोठे घ्यावयाची ? हे ठरविण्याचा अधिकार पंतप्रधानाला आहे. या बैठकीत कोणत्या विषयांवर, कोणत्या खात्यासंबंधी चर्चा करावयाची ? हे पंतप्रधान ठरवितो. मंत्रिमंडळाच्या बैठकी पंतप्रधानाच्या अध्यक्षतेखाली होतात. थोडक्यात, पंतप्रधान मंत्रिमंडळाचा नेता असल्यामुळे मंत्रिमंडळात त्याचे स्थान महत्त्वपूर्ण ठरते.

(iii) **पंतप्रधानाचा मंत्रिमंडळाच्या कार्यावर प्रभाव :-** पंतप्रधान पदावरील व्यक्तीचे विविध खात्यांच्या कारभाराबाबत स्वतःचे काही विचार असतात. उदा. शेती व ग्रामीण क्षेत्र, विज्ञान, उद्योगधंदे यांच्या विकासाबाबत स्वतःची काही मते असतात. सर्व खात्यांशी महत्त्वाचे निर्णय पंतप्रधानांशी विचारविनिमय करून घेतले जातात. त्यामुळे पंतप्रधान पदावरील व्यक्तीच्या विचारांचा, मतांचा व राजकीय आडाख्यांचा प्रभाव मंत्रिपरिषदेच्या कार्यावर पडतो. पंतप्रधानपदावरील व्यक्तीमध्ये बदल घडून आला की, काही खात्यांच्या धोरणामध्ये बदल येत असल्याचा अनुभव आपणास येतो. पंतप्रधानाचा मंत्रिमंडळाच्या कार्यावर प्रभाव असल्यामुळे त्याचे मंत्रिमंडळातील स्थान महत्त्वाचे ठरते.

**(iv) देशातील जनतेचा नेता :-**

पंतप्रधान देशातील जनतेच्या सुखदुःखात सामील होतो. जनतेच्या अडीअडचणी दूर करण्यासाठी स्वतः पुढाकार घेतो. जनतेसाठी आर्थिक, शैक्षणिक विकासाच्या योजना आखतो व त्या राबवितो. जनतेला विविध योजनांमध्ये सहभागी होण्यासाठी प्रेरित करतो. अशाप्रकारे पंतप्रधान संपूर्ण देशातील जनतेचे नेतृत्व करीत असल्यामुळे त्याचे मंत्रिमंडळातील स्थान महत्त्वपूर्ण ठरते.

**(v) राष्ट्रपती आणि मंत्रिमंडळ हयांना साधणारा दुवा:-**

पंतप्रधान राष्ट्रपतीची भेट घेऊन त्यांना विविध खात्यांबाबत मंत्रिमंडळाने ठरविलेल्या धोरणांची माहिती देतो.. शासनकारभाराबाबत राष्ट्रपतीचे विचार जाणून घेतो. पंतप्रधान मंत्रिमंडळाच्या बैठकीत देशाच्या शासनकारभाराबाबत राष्ट्रपतीचे विचार प्रस्तुत करतो. अशाप्रकारे पंतप्रधान हा राष्ट्रपती व मंत्रिमंडळ हयांना साधणारा दुवा असल्यामुळे त्याचे स्थान महत्त्वपूर्ण ठरते.

**(vi) पंतप्रधानाचा राजीनामा म्हणजे संपूर्ण मंत्रिपरिषदेचा राजीनामा समजला जातो :-**

काही मंत्र्यांनी राजीनामे दिले तरीही पंतप्रधान जोपर्यंत पदावर कार्यरत आहे, तोवर संपूर्ण मंत्रिमंडळ अस्तित्त्वात आहे, असेच समजले जाते. परंतु पंतप्रधानाने आपल्या पदाचा राजीनामा दिला तर तो संपूर्ण मंत्रिपरिषदेचा राजीनामा आहे, असे मानले जाते. संरक्षणमंत्री, अर्थमंत्री यासारखे विभिन्न खात्याचे मंत्री आपआपल्या खात्याच्या धोरणाचे स्पष्टीकरण व समर्थन करीत असतात. या स्पष्टीकरणामुळे अनेकदा लोकांचे समाधान होत नाही. परिणामी त्या खात्याच्या मंत्र्यावर सतत टीका होत राहते. अशावेळी स्वतः पंतप्रधान संबंधित मंत्र्यांच्या कार्याचे समर्थन करतो. अशाप्रकारे पंतप्रधान हा मंत्रिमंडळाचा निर्माता, रक्षणकर्ता व संहारकर्ता ठरतो. म्हणून त्याचे मंत्रिमंडळात स्थान महत्त्वपूर्ण आहे.

**(vii) प्रसिद्धीचा केंद्रबिंदू :-**

पंतप्रधान सत्ताधारी पक्षाची जनतेत लोकप्रियता वाढविण्याचा प्रयत्न सातत्याने करीत असतो. यासाठी तो देशातील विविध भागांना भेटी देतो. जनतेची निवेदने स्वीकारतो. जाहीरसभातील भाषणांद्वारे सरकारच्या धोरणाचे स्पष्टीकरण करतो. पत्रकार परिषद घेऊन आपले विचार जनतेपर्यंत पोहचवितो. सत्ताधारी पक्ष, वृत्तपत्रे, दूरदर्शन या सर्वांद्वारे पंतप्रधानाच्या कार्याला व्यापक स्तरावर प्रसिद्धी दिली जाते. अशाप्रकारे पंतप्रधान हा प्रसिद्धीचा केंद्रबिंदू असतो. म्हणून त्याचे स्थान महत्त्वपूर्ण ठरते.

थोडक्यात, मंत्रिमंडळाचा नेता, बहुमतप्राप्त संसदीय पक्षाचा नेता, जनतेचा नेता यासारख्या भूमिकांमुळे भारताच्या संसदीय शासनव्यवस्थेचे स्वरूप पंतप्रधानीय शासनव्यवस्था असे झाले असल्याचे राजकीय अभ्यासकांना वाटते.

## मंत्रिमंडळ(Cabinet):-

भारत, पाकिस्तान, श्रीलंका, नेपाळ, भूतान, मालदीव व बांगलादेश ह्यांना दक्षिण आशियायी देश किवा भारतीय उपखंडातील देश असे संबोधिले जाते. भारताने प्रारंभापासूनच संसदीय पद्धती हा शासनसंस्थेचा प्रकार स्वीकारला आहे. याउलट पाकिस्तान, श्रीलंका, बांगलादेश आदी देशांमध्ये संसदीय पद्धती आणि अध्यक्षीय पद्धती अशा शासनसंस्थेच्या दोन्ही प्रकारांचे प्रयोग करून पाहण्यात आले आहेत. थोडक्यात शासनसंस्थेच्या संसदीय पद्धती या प्रकाराला भारतात जेवढे स्थैर्य लाभले तेवढे स्थैर्य भारतीय उपखंडातील अन्य कोणत्याही देशात लाभले नाही. दक्षिण आशियायी देशांमधील राजकीय परिस्थितीच्या या पार्श्वभूमीवर आपण भारतातील संसदीय शासनव्यवस्थेची रचना आणि तिच्या कार्यपद्धतीतील बारकावे (वैशिष्ठ्ये) समजून घेणे आवश्यक ठरते, असे म्हणता येईल.संसदीय शासनपद्धतीत राज्यकारभाराची संपूर्ण जबाबदारी पंतप्रधान व मंत्रिमंडळावर असते. राष्ट्रपतीने जाहीर केलेले सर्व निर्णय पंतप्रधान व त्यांच्या मंत्रिमंडळाने घेतलेले असतात. म्हणून देशाचा राज्यकारभार जरी राष्ट्रपतीच्या नावाने सुरू असला तरीही राजकीय दृष्टीने त्यासाठी राष्ट्रपती जबाबदार धरला जात नाही. राज्यकारभारात सुव्यवस्था निर्माण करण्यामधील यशाचा अथवा राज्यकारभारात निर्माण झालेल्या गैरव्यवस्था व गोंधळाच्या अपयशाचा मानकरी राष्ट्रपती नसून पंतप्रधान व मंत्रिमंडळच आहे, असे संसदीय शासनव्यवस्थेत समजले जाते. संसदीय शासनव्यवस्थेत पंतप्रधान व त्याच्या मंत्रिमंडळाचे स्थान वास्तविक कार्यकारी प्रमुखाचे असते. या कारणांमुळे संसदीय शासनव्यवस्थेतील पंतप्रधान व मंत्रिमंडळाचा अभ्यास राज्यशास्त्रीय दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरतो.

## मंत्रिमंडळ व मंत्रिपरिषद यातील फरक :-

मंत्रिमंडळ आणि मंत्रिपरिषद (Council of Ministers) ह्या समान अर्थाच्या संज्ञा नाहीत. या दोहोंमधील फरक पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

### मंत्रिपरिषद :-

मंत्रिपरिषदेची रचना दोन किंवा तीन स्तराची असते. म्हणजे मंत्रिपरिषदेत पुढीलपैकी दोन अथवा तीन प्रकारची मंत्रिपदे असतात- (१) **कॅबिनेट मंत्री** (Cabinet ) Minister), (२) **राज्यमंत्री** (Minister of State), (३) **उपमंत्री** (Deputy Minister)

मंत्रिपरिषदेत वर दिल्याप्रमाणे तीन प्रकारचे अथवा मंत्री व उपमंत्री असे दोनच प्रकारचे मंत्र असावेत हे पंतप्रधानाच्या इच्छेवर अवलंबून आहे. तसेच तीनपैकी प्रत्येक प्रकारचे मंत्री किती असावेत हे देखील पंतप्रधानाच्या इच्छेवर अवलंबून आहे. मंत्रिपरिषदेत तीनही प्रकारच्या मंत्र्यांचा समावेश होतो. मंत्रिपरिषदेचा आकार मंत्रिमंडळापेक्षा मोठा असतो. साधारणतः केंद्रीय मंत्रिपरिषदेतील मंत्र्यांची संख्या ८० पेक्षा अधिक असते. संपूर्ण मंत्रिपरिषदेची बैठक क्वचितच होते.

## मंत्रिमंडळ :-

मंत्रिपरिषदेतील फक्त **कॅबिनेट मंत्र्याचा समावेश मंत्रिमंडळात** होतो.. मंत्रिमंडळ हा मंत्रिपरिषदेचा छोटा पण अधिक महत्त्वाचा व शक्तिशाली असा भाग आहे. मंत्रिमंडळात किती मंत्री (कॅबिनेट मंत्री) असावेत ? हे पंतप्रधानाच्या इच्छेवर अवलंबून आहे. सामान्यपणे केन्द्रीय मंत्रिमंडळात २० ते २५ मंत्री असतात. पंतप्रधानाच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळाची नियमित बैठक होते. या बैठकीतच सर्व महत्त्वाचे निर्णय घेतले जातात तसेच धोरणही ठरविले जाते.थोडक्यात संसदीय शासनपद्धतीत मंत्रिमंडळ हीच वास्तविक कार्यपालिका आहे, असे मानले जाते, म्हणून संसदीय शासनव्यवस्थेच्या अभ्यासाचा प्रारंभ मंत्रिमंडळाच्या अभ्यासापासून होतो असे म्हणता येईल. संसदीय शासनव्यवस्थेत राष्ट्रपती हा नाममात्र शासनप्रमुख आहे असे मानले जाते. यामुळे पंतप्रधान व त्यांचे मंत्रिमंडळ हेच वास्तविक कार्यकारी मंडळ ठरते. पंतप्रधानाचे पद महत्त्वपूर्ण आहे याबाबत कोणाचेही दुमत नाही. परंतु देशाचे धोरण ठरविणे व निर्णय घेण्याचा अधिकार एकट्या पंतप्रधानाला नसून मंत्रिमंडळाला आहे. म्हणून पंतप्रधान व त्याचे मंत्रिमंडळ असेच शब्द राज्यशास्त्रीय पुस्तकात वापरले जातात. मंत्रिमंडळाची निर्मिती, रचना, अधिकार व कार्ये यांचे विवेचन पुढीलप्रमाणे करता येईल.

## मंत्रिमंडळाची निर्मिती व मंत्रिमंडळाची रचना :-

संसदीय शासनव्यवस्थेतील मंत्रिमंडळाच्या अभ्यासाचा प्रारंभ मंत्रिमंडळाची निर्मिती कशी होते ? हे समजून घेण्यापासून होतो असे म्हटले जाते. पंतप्रधानाची नियुक्ती व मंत्रिमंडळाची निर्मिती या दोन्ही बाबी एकाच वेळेस घडतात. लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीचे निकाल घोषित होताच विभिन्न राजकीय पक्षांच्या संख्यात्मक शक्तीचे चित्र स्पष्ट होते. लोकसभेत बहुमत प्राप्त करणारा पक्ष आपला नेता निवडण्यासाठी पक्षाच्या बैठकीची तारीख, वेळ व स्थळ जाहीर करतो. या बैठकीत सहभागी होण्यासाठी लोकसभेचे निर्वाचित सदस्य आपआपल्या मतदारसंघातून देशाच्या राजधानीत पोचतात. या बैठकीत पंतप्रधानपदासाठी पक्षनेत्याची निवड केली जाते. पक्षसंघटनेतील सचिव अथवा अन्य कोणताही पदाधिकारी राष्ट्रपतीची भेट घेतो व त्याला पक्षनेत्याच्या निवडीसंबंधीची माहिती देतो. लोकसभेत एकाच राजकीय पक्षाला स्पष्ट बहुमत असेल तर राष्ट्रपती कार्यालयातून निवड झालेल्या नेत्याला पंतप्रधानपदाची शपथ घेण्यासाठी रीतसर आमंत्रण दिले जाते. पक्षनेत्याला प्रधानमंत्री पदाची व त्याने निवडलेल्या सहकाऱ्यांना मंत्रिपदाची समारंभपूर्वक शपथ देण्याचे कार्य राष्ट्रपती करतो. थोडक्यात ज्या पक्षाला लोकसभेत स्पष्ट बहुमत असेल, त्या पक्षाने निवडलेल्या नेत्याची पंतप्रधान म्हणून औपचारिकपणे नेमणूक (नियुक्ती) राष्ट्रपती करतो. पंतप्रधानाने दिलेल्या यादीनुसार राष्ट्रपती मंत्र्यांची नियुक्ती करतो.

मंत्रिमंडळातील आणि मंत्रिपरिषदेतील आपल्या सहकाऱ्याची निवड करणे हे पंतप्रधानपदासाठी निवड झालेल्या पक्षनेत्याच्या दृष्टीने अतिशय अवघड असे कार्य असते. कारण त्याच्यावर सहकारी मंत्र्यांची निवड करण्याबाबत पक्षसंघटनेतून आणि पक्षसंघटनेच्या बाहेरूनदेखील विविध प्रकारची दडपणे वा दबाव येत असतात. ह्या सर्व दबावांचा वा दडपणांचा सामना करून पंतप्रधानपदासाठी निवडलेला नेता मंत्रिमंडळातील आपल्या सहकाऱ्यांची नावे निश्चित करतो. मंत्रिमंडळ व मंत्रिपरिषदेच्या सदस्यांची यादी राष्ट्रपतीला सादर करतो. अशाप्रकारे पंतप्रधान, त्याचे मंत्रिमंडळ व मंत्रिपरिषद अस्तित्वात येते (निर्माण होते).मंत्रिमंडळातील प्रत्येक कॅबिनेट मंत्र्याकडे एका किंवा त्यापेक्षा अधिक स्वतंत्र खात्याच्या कारभाराची जबाबदारी असते. मंत्रिमंडळाने ठरविलेल्या धोरणांची व घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी संबंधित खात्याच्या मंत्र्याकडून केली जाते. कैबिनेट मंत्र्याकडे असलेल्या खात्याच्या कारभाराचा व्याप मोठा असेल, तर राज्यमंत्री व उपमंत्री यांचेवरही त्याच खात्याची अथवा विभागाची जबाबदारी सोपविली जाते. उदा. गृहमंत्री, गृहराज्यमंत्री, गृहउपमंत्री मंत्रिपरिषदेतील काही राज्यमंत्री व उपमंत्री यांच्याकडे स्वतंत्रपणे एकेका खात्याचा कारभार देखील सोपविला जाऊ शकतो. तथापि मंत्रिमंडळाच्या बैठकीत केवळ कैबिनेट मंत्रीच सहभागी होत असतात.

## मंत्रिमंडळाची बैठक व कार्यपद्धती :-

राज्यकारभाराचे धोरण ठरविणे व निर्णय घेणे हे निर्वाचित प्रतिनिधींच्या लहान आकाराच्या गटाचे सामूहिक कार्य आहे, असे संसदीय पद्धतीत समजले जाते. राज्यकारभाराची जबाबदारी संपूर्ण मंत्रिपरिषदेवर असली तरीही मंत्रिपरिषदेचा आकार मोठा असतो. म्हणून राज्याचे (राज्यकारभाराचे) धोरण ठरविणे व निर्णय घेणे ही मंत्रिमंडळाचीच जवाबदारी होय, असा संकेत संसदीय शासनव्यवस्थेत प्रस्थापित झाला आहे. पंतप्रधान हा मंत्रिमंडळाचा नेता असला, तरीही संविधानानुसार राज्यकारभाराचे धोरण ठरविणे व निर्णय घेणे ही मंत्रिमंडळाची जबाबदारी आहे. मंत्रिमंडळाची बैठक आमंत्रित करणे हे पंतप्रधानाचे कार्य आहे. तसेच मंत्रिमंडळाच्या बैठकीत कोणत्या विषयावर म्हणजे कोणत्या शासकीय खात्यांच्या धोरणाबाबत चर्चा करावयाची? हे निश्चित करण्याचा अधिकार पंतप्रधानाला असतो. अशाप्रकारे पंतप्रधानाच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळाची बैठक होते. या मंत्रिमंडळ बैठकीत पंतप्रधानांनी निश्चित केलेल्या विषयांवर मंत्रिमंडळ सदस्यांना आपली मते मांडता येतात. या चर्चेतून संबंधित विषयाच्या धोरणाबाबतचे विविध पैलू अधिक स्पष्ट होतात. चर्चेच्या शेवटी सामान्यपणे एकमताने निर्णय घेतला जातो. मंत्रिमंडळाच्या बैठकीत होणारी चर्चा हो गुप्त असते. मंत्र्यांनी पदस्थान ग्रहण करताना गोपनीयतेची शपथ घेतलेली असते. मंत्रिमंडळ बैठकीतील चर्चा इतरत्र करता येत नाही. अलीकडे बैठकीत होणाऱ्या कामकाजाची लेखी स्वरूपातील नोंद ठेवण्याची पद्धती विकसित झाली आहे. हे कार्य करण्याची जबाबदारी मंत्रिमंडळ (कॅबिनेट सेक्रेटरी) या वरिष्ठ सनदी अधिकाऱ्याची असते. गोपनीय स्वरूप असणारी शासकीय कागदपत्रे काही काळानंतर प्रसिद्ध केली जातात. परंतु मंत्रिमंडळ बैठकीतील कामकाजाच्या नोंदी मात्र प्रसिद्ध केल्या जात नाहीत.

मंत्रिमंडळाच्या बैठकीत कोणत्या विषयावर चर्चा करावयाची आहे ? यासंबंधीची सूचना पंतप्रधानाच्या कार्यालयातून मंत्रिमंडळाच्या सदस्यांना देण्याची पद्धती अलीकडच्या काळात निर्माण झाली आहे. या पद्धतीमुळे मंत्र्यांना महत्त्वपूर्ण विषयांवर विचार करून स्वतःचे मत निश्चित करण्यासाठी पुरेसा वेळ मिळतो. यामुळे मंत्रिमंडळाला अधिक कार्यक्षमतेने काम करणे शक्य होते. काही महत्त्वपूर्ण विषयांचा अधिक सखोल व सविस्तर विचार करण्यासाठी तीन-चार मंत्र्यांची एक समिती नियुक्त करण्याची पद्धती निर्माण झाली आहे. ही मंत्रिमंडळ समिती आपल्या कार्याचा अहवाल पंतप्रधानाला सादर करते. या अहवालावर मंत्रिमंडळ बैठकीत चर्चा करून निर्णय घेतला जातो. या पद्धतीमुळे मंत्रिमंडळाचा वेळ वाचतो व मंत्रिमंडळाला कार्यक्षमतेने कार्ये करणे शक्य होते.

## सामूहिक जबाबदारीचे तत्त्व :-

केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत सर्व खात्यांच्या कारभारासंबंधीचे धोरण ठरविले जाते व महत्त्वपूर्ण निर्णय घेतले जातात. उदा. रेल्वे प्रवासी दरवाढीचा निर्णय फक्त रेल्वेमंत्र्यांनी घेतलेला नसतो. अबकारी करामध्ये वाढ करण्याचा निर्णय फक्त अर्थमंत्र्यांनी घेतलेला नसतो. मंत्रिमंडळाच्या बैठकीत या महत्त्वपूर्ण विषयांवर चर्चा झालेली असते. म्हणजे वर उल्लेखित दोन्ही महत्त्वपूर्ण निर्णयांमध्ये मंत्रिमंडळातील अन्य खात्यांच्या कॅबिनेट मंत्र्यांचाही सहभाग असतो. म्हणून मंत्रिमंडळाने एकदा निर्णय घेतला की, त्या निर्णयाला सर्व मंत्र्यांना आपला पाठिंबा द्यावाच लागतो. त्या निर्णयाचे संसदेत आणि संसदेबाहेरही सर्व मंत्र्यांना समर्थन करावेच लागते. त्या पद्धतीमुळे संपूर्ण मंत्रिमंडळाला संघभावनेने  कार्ये करणे शक्य होते. या चर्चेच्या आधारे सामूहिक जबाबदारीच्या तत्त्वाचा अर्थ पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.केंद्रीय मंत्रिमंडळ व मंत्रिपरिषदेतील सर्व मंत्री सामूहिकरीत्याच शासनकारभाराबाबत संसदेस जबाबदार आहेत. केंद्र शासनाच्या प्रत्येक खात्याचे धोरण व निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी संपूर्ण मंत्रिमंडळास जबाबदार धरले जाते. मंत्रिमंडळाने घेतलेल्या एखाद्या विशिष्ट निर्णयाबाबत कोणत्याही मंत्र्याचे तीव्र स्वरूपाचे मतभेद असतील, तर तो राजीनामा देऊ शकतो. मंत्र्याला आपले पद सोडावयाचे नसेल, तर सामूहिक जबाबदारीच्या तत्त्वानुसार मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयाबद्दल मतभेद व्यक्त करता येत नाहीत. भारतात मंत्रिमंडळाच्या बैठकीत एखाद्या विशिष्ट विषयासंबंधीच्या धोरणाबाबत मतभिन्नता झाल्यामुळे मंत्रिपदाचा राजीनामा देण्याचे काही प्रसंग घडले आहेत. उदा. पं. नेहरूंच्या काळात डॉ. आंबेडकर, चिंतामणराव देशमुख यांनी धोरणात्मक मतभिन्नतेतून मंत्रिपदाचा राजीनामा दिला होता.

**वैयक्तिक जबाबदारीचे तत्त्व :-**

मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयांची व ठरविलेल्या धोरणांची अंमलबजावणी शासकीय खात्यांद्वारे केली जाते. कोणत्याही शासकीय खात्याशी संबंधित कार्यामध्ये गैरव्यवहार वा गोंधळ झाल्यास ती संबंधित खात्याच्या मंत्र्यांची वैयक्तिक जबाबदारी आहे, असे समजले जाते. मंत्री हा खात्याचा राजकीय प्रमुख असल्यामुळे त्या खात्यासंबंधी तोच संसदेला उत्तरदायी असतो. खात्यातर्फे होणाऱ्या कामाच्या श्रेयाचा तसेच अपश्रेयाचाही धनी मंत्रीच ठरतो. काही वेळा मंत्र्यांना वैयक्तिक जबाबदारीच्या तत्वानुसार खात्यातील गैरव्यवहार व गोंधळाबाबत राजीनामाही द्यावा लागतो.

अशाप्रकारे वैयक्तिक व सामूहिक जबाबदारीची तत्त्वे ही संसदीय शासनव्यवस्थेतील मंत्रिमंडळाच्या कार्यपद्धतीची प्रमुख आधारभूत तत्त्वे होत, असे म्हटले जाते.

**मंत्रिमंडळाचा कार्यकाल :-**

सत्तारूढ मंत्रिमंडळाचा कार्यकाल लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुका होऊन नवीन मंत्रिमंडळ अस्तित्वात येईपर्यंत आहे, असे समजले जाते. लोकसभेच्या निवडणुकीत सत्ताधारी पक्षाला बहुमत प्राप्त न झाल्यास निवडणुकीचे सर्व निकाल घोषित होताच मंत्रिमंडळाला राजीनामा सादर करावा लागतो. राष्ट्रपती हा राजीनामा मान्य करून (स्वीकारून) नवीन मंत्रिमंडळ पदस्थान ग्रहण करेपर्यंत जुन्या मंत्रिमंडळाने काळजीवाहू मंत्रिमंडळ म्हणून राज्यकारभार सांभाळावा, अशी विनंती करतो. मंत्रिमंडळ आपल्या कार्याबाबत लोकसभेला उत्तरदायी असते. त्यामुळे लोकसभेत अविश्वासाचा ठराव मंजूर होताच, मंत्रिमंडळाला पदत्याग करावा लागतो. तसेच पंतप्रधानाचा राजीनामा किंवा मृत्यू यासारख्या कारणांमुळे संपूर्ण मंत्रिमंडळ विसर्जित झाले आहे, असे समजले जाते. सामान्य परिस्थितीत मंत्रिमंडळाचा कार्यकाळ लोकसभेच्या कार्यकाळाएवढाच म्हणजे पाच वर्षांचा असतो, असे म्हणता येईल.

**मंत्रिमंडळाची कार्ये व अधिकार :-**

संविधानातील तरतुदीनुसार राष्ट्रपतीला राज्यकारभारासंबंधी सल्ला देणे, हेच मंत्रिमंडळाचे कार्य आहे. राष्ट्रपती कार्यकारी प्रमुख असला तरीही त्याच्या सत्तेचा व अधिकारांचा वापर मंत्रिमंडळच करीत असते. यामुळे मंत्रिमंडळालाच कार्यकारी विभागाची सर्व कार्ये करावी लागतात. संसदीय शासनव्यवस्थेच्या तत्वानुसार संसदेच्या दोन्ही सभागृहात बहुमताने घेण्यात आलेल्या सर्व निर्णयांची अंमलबजावणी करणे हे मंत्रिमंडळाचे कार्य आहे. मंत्रिमंडळाच्या कार्याचे मुद्देसूद विवेचन पुढीलप्रमाणे करता येईल.

**(१) धोरण ठरविणे :-**

राज्यकारभारविषयक धोरण ठरविणे व निर्णय घेणे हे मंत्रिमंडळाचे शासनविषयक कार्य आहे. संरक्षण, कृषी, शिक्षण, आरोग्य, व्यापार, पर्यावरण इत्यादी सार्वजनिक हिताशी संबंधित विषयांवर धोरण ठरविण्याचे व निर्णय घेण्याचे कार्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत होत असते. परराष्ट्र धोरण ठरविण्याचे कार्यही मंत्रिमंडळच करीत असते. राज्यपाल, परराष्ट्र राजदूत, संविधानात तरतूद असलेल्या सर्व आयोगांचे अध्यक्ष, किंबहुना राष्ट्रपतीच्या नावाने होणाऱ्या सर्व महत्त्वाच्या नेमणुकांचे निर्णय मंत्रिमंडळच करते.
राज्यकारभाराचे धोरण ठवितांना देशाची गरज, जनतेची इच्छा व प्राप्त परिस्थिती या सर्वांचा विचार केला जातो. कारण मंत्रिमंडळाने ठरविलेल्या धोरणाला संसदेचा व पर्यायाने जनतेचा पाठिंबा हवा असतो. काही वेळा विविध हितसंबंधी गटांच्या तीव्र विरोधामुळे मंत्रिमंडळाला आपल्या धोरणात फेरबदलही करावे लागतात. कारण बहुमत प्राप्त करून पुन्हा सत्तारूढ होण्यासाठी धोरण ठरविताना व निर्णय घेताना लोकमताच्या पाठिंब्याचा विचार मंत्रिमंडळाला करावाच लागतो.

**(२) अंमलबजावणीविषयक कार्ये व अधिकार :-**

धोरण ठरविल्यानंतर त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करणे हे मंत्रिमंडळाचेच कार्य आहे. या कार्याला मंत्रिमंडळाचे प्रशासनविषयक कार्ये असे म्हटले जाते. धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी विविध शासकीय खाती निर्माण केलेली असतात. प्रत्येक शासकीय खात्यात सनदी नोकरवर्ग असतो. संपूर्ण देशात सर्व खात्यांच्या धोरणांची व निर्णयांची अंमलबजावणी नोकरशाहीद्वारे होत असते. प्रत्येक शासकीय खात्याचा राजकीय प्रमुख मंत्री असतो. त्याचे आपल्या खात्याशी संबंधित सनदी नोकरवर्गावर पूर्ण नियंत्रण असते. वरिष्ठ सनदी अधिकाऱ्यांनी केलेल्या कार्याची चौकशी करण्याचे किंवा त्यांची बदली करण्याचे अधिकार मंत्रिमंडळाला असतात. या अधिकारांमुळेच मंत्रिमंडळाचे नोकरशाहीवर दृढ नियंत्रण प्रस्थापित होते व मंत्रिमंडळाला सनदी नोकरवर्गाकडून धोरणांची व निर्णयांची प्रभावीपणे अंमलबजावणी करून घेणे शक्य होते.

**(३) समन्वयविषयक कार्ये :-**

गृहखाते, संरक्षणखाते, रेल्वेखाते याप्रमाणे सर्वच शासकीय खात्यांची कार्ये वेगवेगळी असतात. तसेच प्रत्येक खात्याचा सनदी नोकरवर्गही स्वतंत्र व वेगळा 'असतो. तथापि आपल्या खात्याशी संबंधित कार्ये करण्यासाठी अन्य खात्यांच्या मदतीची गरज निर्माण होते. यामुळे विविध शासकीय खात्यांच्या कार्यात समन्वय वा सुसूत्रीकरण (Co- ordination) असणे आवश्यक ठरते. विविध शासकीय खात्यांच्या कार्यात समन्वय राखण्याचे कार्य मंत्रिमंडळ करते. हे कार्य प्रामुख्याने मंत्रिमंडळ सचिवालयामार्फत चालते. यामुळे मंत्रिमंडळ सचिवालयाला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे.

## (४) विधिविषयक कार्ये :-

मंत्रिमंडळाने ठरविलेल्या धोरणांची अंमलबजावणी करण्यासाठी विधिनियम तयार करण्याची नितांत आवश्यकता असते. विभिन्न खात्यांचे मंत्री आपआपल्या खात्याशी संबंधित विधेयक तयार करून संसदेत मांडतात. संसदेने मंजूर केलेल्या विधेयकांपैकी बहुतेक सगळी विधेयके मंत्रिमंडळाकडून मांडली गेलेली असतात. अशाप्रकारे शासकीय खात्यांच्या कार्याशी संबंधित आवश्यक असणारी विधेयके तयार करून संसदेच्या सभागृहात मांडणे, हे मंत्रिमंडळाचे एक प्रमुख कार्य आहे.

## (५) आर्थिक स्वरूपाची कार्ये :-

आर्थिक विकासाच्या योजना मंत्रिमंडळच तयार करते. नियोजन आयोगही मंत्रिमंडळाच्या सल्ल्याने कार्य करतो. अंदाजपत्रक अर्थमंत्री तयार करतो. ते तयार करताना तो प्रधानमंत्र्यांशी चर्चा करतो. अंदाजपत्रक तयार करण्याचे कार्य सोडून अन्य सर्व आर्थिक स्वरूपाचे शासकीय व्यवहार मंत्रिमंडळाच्या कक्षेत असतात. उदा. आयात-निर्यात धोरण ठरविणे, परदेशांकडून भांडवली कर्ज घेणे इत्यादी.

## मंत्रिमंडळाची भूमिका :-

संसदीय शासनपद्धतीत संपूर्ण देशाचा राज्यकारभार नाममात्र शासनप्रमुखाच्या म्हणजे राष्ट्रपतीच्या नावाने सुरू असतो. तरीही या पद्धतीत पंतप्रधान व त्यांचे मंत्रिमंडळ हीच वास्तविक कार्यपालिका होय असे मानले जाते. कारण राज्यकारभारविषयक सर्व धोरण मंत्रिमंडळच ठरवित असते. तसेच राज्यकारभारविषयक सर्व निर्णय मंत्रिमंडळाच्या बैठकीतच घेतले जातात. त्यांची लेखी नोंदही ठेवली जाते. राज्यकारभाराचे धोरण ठरविण्याचा आणि निर्णय घेण्याचा अधिकार एकट्या पंतप्रधानाला नाही, तर तो मंत्रिमंडळाला आहे. मंत्रिमंडळाने ठरविलेल्या धोरणांना आणि निर्णयांना राष्ट्रपतीची तसेच संसदेचीही औपचारिक मान्यता मिळतेच. कारण लोकसभेत बहुमत प्राप्त करणाऱ्या पक्षाचेच मंत्रिमंडळ सत्तारूढ असते. बहुमत असल्यामुळे मंत्रिमंडळाने संसदेत मांडलेले विधेयक मंजूर होतेच. संसदीय शासनव्यवस्थेत तत्त्वतः संसद सार्वभौम असली, तरीही प्रत्यक्ष व्यवहारात मंत्रिमंडळाच्या तुलनेत संसदेची सत्ता दुय्यम ठरली आहे, अशी खंत राज्यशास्त्राचे अनेक अभ्यासक व्यक्त करतात. म्हणूनच राज्यशास्त्राचे काही अभ्यासक संसदीय शासनपद्धतीला 'मंत्रिमंडळात्मक शासनपद्धती' असे संबोधणे अधिक योग्य होय, असे मत मांडतात.

यावरून संसदीय पद्धतीत मंत्रिमंडळाची भूमिका महत्त्वपूर्ण असते हे स्पष्ट होते. मंत्रिमंडळात सत्तारूढ पक्षातील वरिष्ठ व ज्येष्ठ नेते असतात. ते देशाच्या वेगवेगळ्या भागांचे (प्रदेशांचे) प्रतिनिधित्व करीत असतात. तसेच ते समाजामधील महिला, अल्पसंख्याक अशा विभिन्न आणि प्रमुख गटांचे प्रतिनिधित्व करीत असतात. मंत्रिमंडळ पद्धतीमुळे संपूर्ण सत्तारूढ पक्षाचा आणि देशातील जनतेचा राजकीय पाठिंबा मिळविणे पंतप्रधानाला शक्य होते. बहुतांश मंत्रिमंडळ सदस्यांच्या विरोधात जाऊन म्हणजे त्यांचा पाठिंबा नसताना निर्णय घेणे पंतप्रधानाला शक्य होत नाही. म्हणूनच संसदीय शासनपद्धतीत मंत्रिमंडळाची भूमिका महत्त्वपूर्ण होय असे म्हटले जाते.

भारताच्या केंद्रीय कार्यकारी मंडळात राष्ट्रपती आणि मंत्रिमंडळाचा समावेश होतो. केंद्रीय कार्यकारी मंडळाचा प्रमुख राष्ट्रपतीच आहे. म्हणून राष्ट्रपती आणि मंत्रिमंडळ यांच्या परस्परसंबंधांचा अभ्यास करणे आवश्यक ठरते. **राष्ट्रपती आणि मंत्रिमंडळाच्या परस्परसंबंधांचे** स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे करता येईल.

**(i) राष्ट्रपतीचे मंत्रिमंडळाबाहेरील स्थान :-**

राष्ट्रपती केंद्रीय कार्यकारी मंडळाचा प्रमुख असला, तरीही मंत्रिमंडळाची बैठक बोलावू शकत नाही. मंत्रिमंडळाच्या बैठकीचे अध्यक्षस्थान ग्रहण करू शकत नाही. कारण राष्ट्रपती मंत्रिमंडळाचा नेता नाही. पंतप्रधानच मंत्रिमंडळाचा नेता आहे. म्हणून राष्ट्रपतीचे स्थान मंत्रिमंडळापेक्षा वेगळे आहे. केंद्रीय कार्यकारी मंडळात राष्ट्रपती व पंतप्रधान या दोहोंचा समावेश होत असला, तरीही राष्ट्रपतीचा दैनंदिन शासकीय कार्याशी संबंध नसतो. राष्ट्रपती व मंत्रिमंडळ यांना जोडणारा दुवा म्हणजे पंतप्रधान होय.

**(ii) मंत्रिमंडळ राष्ट्रपतीला उत्तरदायी नाही :-**

पंतप्रधानासह मंत्रिमंडळातील सर्व मंत्र्यांची नियुक्ती राष्ट्रपती करतो. पंतप्रधानाने राजीनामा दिला किंवा त्याचा मृत्यू झाला तर नवीन पक्षनेत्याची निवड होईपर्यंत तो काळजीवाहू मंत्रिमंडळ नियुक्त करतो. तथापि तो मंत्रिपरिषदेचा स्वामी नाही. कारण मंत्रिमंडळ राज्यकारभाराबाबत राष्ट्रपतीला जबाबदार नाही. ते संसदेला जबाबदार आहे. सोप्या शब्दात मंत्रिमंडळाचे उत्तरदायित्व प्रत्यक्षपणे संसदेप्रति आणि अंतिमरित्या जनतेप्रति आहे.

**(iii) राष्ट्रपतीचे सर्व निर्णय मंत्रिमंडळाच्या सल्ल्यानुसार :-**

राष्ट्रपती केंद्रीय कार्यकारी मंडळाचा प्रमुख आहे. सर्वोच्च प्रमुख या नात्याने त्याला विविध कार्ये करावी लागतात. उदा. राज्यपाल, राजदूत, विविध आयोगांचे अध्यक्ष यांसारख्या अनेक महत्त्वपूर्ण पदांवर योग्य व्यक्तींची नियुक्ती करण्याचे कार्य त्याला करावे लागते. साहित्य, कला, क्रीडा, विज्ञान इत्यादी क्षेत्रातील गुणवान व्यक्तींचा गौरव करण्यासाठी त्यांना भारतरत्न, पद्मश्री ह्यासारख्या पदव्या समारंभपूर्वक देणे हे देखील राष्ट्रपतीचे कार्य आहे. तथापि, ही सर्व कार्ये राष्ट्रपती स्वतः निर्णय घेऊन करीत नाही. मंत्रिमंडळाच्या सल्ल्यानुसारच राष्ट्रपती ही सर्व कार्ये करतो.

ALL THE BEST

# गोविंदराव वारजूकर महाविद्यालय, नागभीड





## राज्यशास्त्र विभाग

# भारतीय लोकशाही

B.A. भाग1(सेम.i)

**प्रा.मंगेश टी.देवढगले**

This Photo by Unknown Author is licensed under CC BY-NC-ND



# लोकशाहीचा उगम ,अर्थ,व्याख्या

साधारणतः इसवी सन पूर्व काळातील ग्रीक नगरराज्यापासून लोकशाहीचा उदय झाला. ‘अथेन्स नगरराज्यात’ प्रत्यक्ष लोकशाही होती, परंतु त्या लोकशाहीचा पाया अत्यंत संकुचित होता, कारण निम्म्यापेक्षा जास्त लोकांना (स्त्रिया व गुलाम) राज्यकारभारात सहभागी होण्याची संधी नव्हती. खऱ्या अर्थाने सतराव्या शतकात लोकशाही विचारांचा व शासन पद्धतीचा विकास झाला असे म्हणता येईल.

## लोकशाहीचा अर्थ:-

ग्रीक भाषेतील 'Demos' व 'Kratos' या दोन शब्दापासून 'डेमोक्रसी’ हा शब्द बनला आहे.

Demos + Kratos = Democracy

जनता/ लोक + शक्ती/ सत्ता = लोकांची सत्ता/राज्य

# लोकशाहीच्या व्याख्या :-

1. अब्राहम लिंकन, “लोकांचे, लोकांनी आणि लोकांकरिता चालवलेले शासन म्हणजे लोकशाही होय.”

2. प्रा. सिली, “ज्या शासनात प्रत्येकाला सहभागी होता येते ते शासन लोकशाही शासन होय.”

3. प्रा. डायसी, “लोकशाही हा शासनाचा असा प्रकार आहे की, ज्यात संपूर्ण राष्ट्राच्या मानाने फार मोठ्या अंशाकडून कारभार चालविला जातो.”

5.प्रा. लास्की, “लोकशाही हे केवळ शासनाचे स्वरूप नाही तर ते समाजाचे, राज्याचे तसेच आर्थिक व नैतिक सुव्यवस्थेचे एक स्वरूप आहे.”

# लोकशाहीचे स्वरूप



लोकशाहीचे स्वरूप
व्यक्तिस्वातंत्र्य
नागरिकांचे हक्क व सुरक्षितता
बहुमताचे शासन
जनतेचे सार्वभौमत्व
लोकशाही जीवनप्रणाली

# लोकशाहीचे घटक:-

व्यक्तीस्वातंत्र्य

समानता

सदाचार

विवेकशीलता

शिक्षण

विवेकपूर्ण लोकमत

पराकोटीच्या विषमतेचा अभाव

सुयोग्य संघटन व नेतृत्व

लोकशाहीवर विश्वास


# लोकशाहीची लक्षणे/ वैशिष्ट्ये :-

- जीविताचा हक्क
- स्वातंत्र्याचा हक्क
  - व्यक्तीगत स्वातंत्र्य
  - राजकीय स्वातंत्र्य
  - आर्थिक स्वातंत्र्य
- नागरी स्वातंत्र्य
  - विचार व अभिव्यक्ती स्वातंत्र्य
  - वृत्तपत्रे स्वतंत्र्य
  - सभा व संघटना स्वतंत्र्य
- समतेचा हक्क
- धार्मिक स्वातंत्र्य
- संपत्तीचा हक्क

# लोकशाही शासनाची लक्षणे:-

- व्यापक मताधिकार
- जनतेचे सार्वभौमत्व
- प्रतिनिधीमार्फत शासन
- निवडणुका हे अविभाज्य अंग
- बहुपक्षीय पद्धती

- संमतीला महत्त्वाचे स्थान
- सत्तेचे विकेंद्रीकरण
- न्यायालयाचे स्वातंत्र्य
- मूलभूत अधिकाराच्या संरक्षणाची हमी
- कायद्याचे समान संरक्षण


लोकशाहीचे प्रकार
अप्रत्यक्ष/ प्रातिनिधिक लोकशाही
प्रत्यक्ष लोकशाही
संसदीय लोकशाही
अध्यक्षीय लोकशाही

# लोकशाही

## गुण

१)लोककल्याणासाठी सत्तेचा वापर

२)जबाबदारीचे तत्व

3)श्रेष्ठ जीवनमूल्यांवर आधारित

४)व्यक्तीस्वातंत्र्य आणि व्यक्तित्व विकास

५)उपलब्ध गुणवत्तेचा लाभ समाजाला होतो

६)कार्यक्षमता

७)शासनाचे स्थैर्य

८)शांततापूर्ण सत्तातरे

९)शैक्षणिक मूल्य

१०)लोकशाही हा जीवन मार्ग आहे

## दोष

१)संख्येला अधिक महत्व

२) अयोग्य व अक्षम व्यक्तीचा कारभार

3) प्रतिनिधित्वाचे तत्वच चूक आहे

४) बहुमताची जुलमी सत्ता

५) धनिकांच्या सत्तेला वाव

६) वेळेचा व पैशाचा अपव्यय

७) नोकरशाहीची सत्ता

लोकशाहीचे आधुनिक आधार

# भारताचे संविधान

## उद्देशिका

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडवण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस :

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय** ;

विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा व उपासना यांचे **स्वातंत्र्य** ;

दर्जाची व संधीची **समानता** ;

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता आणि एकात्मता यांचे आश्वासन देणारी **बंधुता** प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून ;

**आमच्या संविधानसभेत**

आज दिनांक २६ नोव्हेंबर, १९४९ रोजी

**याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**

## भारतीय संविधानाचे तत्त्वज्ञान:-

### उद्देशपत्रिकेचे तीन भाग

#### राज्य व्यवस्थेचे स्वरूप

१)सार्वभौम राज्य

२)समाजवादी राज्यव्यवस्था

3)धर्मनिरपेक्ष राज्यव्यवस्था

४)प्रजासत्ताक राज्यव्यवस्था

५)गणराज्य व्यवस्था

#### शासन व्यवस्थेची उद्दिष्टे

१)न्याय

२)स्वातंत्र्य

3)समता

४)बंधुता

#### संविधानाची उगमस्थान

भारतीय जनता